**SNBP INTERNATIONAL& Sr. SECONDARY SCHOOL, CHIKHALI, PUNE**
**Affiliation No. 1130703**
**PT – 4 ANSWER KEY (2024-25)**

| GRADE: VIII | SUBJECT: MARATHI | DATE: 14.02.25 | TIME: 3HRS | MARKS: 60 |
|---|---|---|---|---|

## विभाग 'अ' (गद्य आकलन)

**प्रश्न १. खालील उतारा वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

शिक्षण हा माणसाच्या जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. शिक्षणामुळे माणसाला ज्ञान प्राप्त होते आणि त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. प्राचीन काळात गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जाई, परंतु आधुनिक काळात शाळा, महाविद्यालये आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षणाचा स्तर अधिक व्यापक झाला आहे. शिक्षण केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित नाही, तर जीवनातील अनेक महत्त्वाच्या कौशल्यांचा विकाससुद्धा यात होतो. शिक्षणामुळे समाजात समानता प्रस्थापित होते आणि प्रत्येक व्यक्तीला स्वयंपूर्ण होण्याची संधी मिळते.

१. प्राचीन काळातील शिक्षणपद्धती कोणती होती?
उत्तर प्राचीन काळात गुरुकुल पद्धतीने शिक्षण दिले जाई.
२. माणसाच्या जीवनाचा अत्यंत महत्वाचा भाग कोणता आहे?
उत्तर माणसाच्या जीवनाचा अत्यंत महत्वाचा भाग शिक्षण आहे
३. शिक्षणामुळे कशाची संधी मिळते?
उत्तर शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तीला स्वयंपूर्ण होण्याची संधी मिळते.
४. शिक्षणाचा स्तर कशामुळे अधिक व्यापक झाला?
उत्तर आधुनिक काळात शाळा, महाविद्यालये आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षणाचा स्तर अधिक व्यापक झाला आहे.
५. शिक्षणामुळे समाजात काय प्रस्थापित होते?
उत्तर शिक्षणामुळे समाजात समानता प्रस्थापित होते.

**प्रश्न २. योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**
(खंबीरपणे,तळबीड,बहादूरखान,भुईकोट,बालेश्वर)
१. सर सेनापती हंबीरराव यांची समाधी तळबीड ठिकाणी आहे.
२. पेडगावचा किल्ला हा भुईकोट किल्ला आहे.
३. मामा या नात्याने ते संभाजीराजे यांच्या पाठीमागे ते खंबीरपणे उभे राहिले.
४. बहादूरखान छत्रपती शिवाजी महाराज पेडगावचा शहाणा म्हणत असे.

**प्रश्न ३. एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ४ )**
१. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर हल्ला करून किती खजिना मिळविला होता?
उत्तर छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यावर हल्ला करून २०० अरबी घोडे व एक कोटींचा शाही खजिना मिळविला.
२. हंबीरराव यांचा जन्म कोठे झाला?
उत्तर हंबीरराव यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील तळबीड येथे झाला.
३. संभाजी महाराज यांना औरंगजेबसमोर कोणत्या किल्ल्यात हजर करण्यात आले?
उत्तर संभाजी महाराज यांना औरंगजेबसमोर पेडगावच्या किल्ल्यात हजर करण्यात आले.
४. हंबीरराव यांचे मूळ नाव काय होते?

उत्तर हंबीरराव यांचे मूळ नाव हंसाजी असे होते.

५. पेडगावच्या किल्ल्यातील सर्वात प्राचीन व सुंदर मंदीर कोणते?

उत्तर लक्ष्मी नारायण मंदिर हे पेडगावच्या किल्ल्यातील सर्वात प्राचीन व सुंदर मंदीर आहे.

**प्रश्न ४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही 3)**

**१.** सर सेनापती यांच्या विषयी थोडक्यात माहिती लिहा.

उत्तर हंबीरराव मोहिते हे निर्णय घेणे आणि पराक्रम गाजवणे यात निष्णात होते.छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या स्वराज्यातील ते १६७४ पर्यंत सेनापती होते.त्यांनी गाजवलेल्या शौर्यामुळे खुश होऊन छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांना 'हंबीरराव'ही पदवी बहाल करून सेनापतीचे सरसेनापती केले.
संभाजीराजे यांच्या राज्याभिषेकानंतर हंबीररावांनी अनेक ठिकाणी स्वाऱ्या केल्या,अनेक युद्धे जिंकली.अनेक शत्रूंना हैराण करून सोडले.शत्रूंवर हल्ले करून पराक्रम गाजवले.अनेक शत्रूंचा पराभव केला.

२. पेडगावच्या किल्ल्याचे तुमच्या शब्दात वर्णन करा.

उत्तर पेडगावचा किल्ला हा स्थलदुर्ग म्हणजेच भुईकोट किल्ला आहे.अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्याच्या उत्तरेला भीमा नदी व सरस्वती नदीच्या संगमावर हा किल्ला आहे.या किल्ल्याचा आकार भव्य अंडाकृती आहे.तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या रक्तरंजित इतिहासाचा हा किल्ला साक्षीदार आहे.

३. छोटे कुटुंब काळाची गरज का आहे?स्पष्ट करा.

उत्तर आजच्या काळात छोटे कुटुंब ही काळाची गरज बनली आहे. आधुनिक जीवनशैली, महागाई आणि संसाधनांची कमतरता यामुळे मोठ्या कुटुंबाचा सांभाळ करणे कठीण झाले आहे. लहान कुटुंब असल्यास प्रत्येक व्यक्तीला अधिक चांगल्या सुविधा व शिक्षण मिळू शकते. तसेच, लहान कुटुंबामुळे आर्थिक भार कमी होतो आणि जीवन अधिक सुगम होते. यामुळे कुटुंबातील सदस्यांचे आरोग्य, शिक्षण आणि व्यक्तिमत्व विकास अधिक चांगल्या प्रकारे साध्य होतो. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठीही लहान कुटुंब उपयोगी ठरते, कारण संसाधनांचा वापर मर्यादित होतो. म्हणूनच, "हम दो, हमारे दो" हा मंत्र स्वीकारणे आवश्यक आहे.

४. छत्रपती शिवाजी महाराज आणि सर सेनापती हंबीरराव यांच्या नातेसंबंधाविषयी माहिती लिहा.

उत्तर सर सेनापती हंबीरराव यांची बहीण सोयराबाई या छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या पत्नी होत्या.संभाजी महाराजांचे ते मामा होते.राजे संभाजी महाराजांचे सावत्र भाऊ राजाराम यांच्याशी हंबीरराव मोहिते यांच्या कन्या महाराणी ताराराणी यांचे लग्न झाले होते.

**प्रश्न ५. योग्य पर्याय निवडून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. छत्रपती शिवाजी महाराजांनी हंबीरराव यांना कोणती पदवी बहाल केली?

अ.सचिव **ब.हंबीरराव** क.महाराज ड.पंडीत

२. पेडगावचा किल्ला कोणत्या नदीच्या संगमावर आहे?

अ.**भीमा व सरस्वती** ब.गंगा व यमुना क.गोदावरी व नर्मदा ड.कावेरी व सिंधू

३. विजापूरच्या लढाईत कोणाला वीरमरण आले?

अ. संभाजी ब.शिवाजी क.हंबीरराव **ड.प्रतापराव**

४. संभाजी महाराज व औरंगजेब भेटीच्या वेळी त्यांच्यासोबत कोणते कवी होते?

अ.गंगाधर **ब.कलश** क.मुकुंदराज ड.तानसेन

**प्रश्न ६. खालील कृती सोडवा.**

हंबीरराव मोहिते

| जन्मगाव | मृत्यूचे ठिकाण |
|---|---|
| तळबीड | केंजळगडच्या पायथ्याशी |

**विभाग 'ब' (व्याकरण)**

**प्रश्न ७. खालील अविकारी शब्दांच्या जातीचा तक्ता पूर्ण करा.**
**(अरे वा!,भरभर,पाठीमागे,आणि,बाप रे!,व,दाट,वर )**

| शब्दयोगी अव्यय | उभयान्वयी अव्यय | केवलप्रयोगी अव्यय | क्रियाविशेषण अव्यय |
|---|---|---|---|
| पाठीमागे | आणि | अरे वा! | भरभर |
| वर | व | बाप रे! | **दाट** |

**प्रश्न ८. खालील वाक्याचा प्रकार ओळखा व लिहा.**

१. जर अभ्यास केला तर तू पास होशील. वाक्याचा प्रकार = मिश्रवाक्य
२. रोज सकाळी लवकर उठावे. वाक्याचा प्रकार = केवलवाक्य
३. मी आणि माझा भाऊ खूप खेळतो. वाक्याचा प्रकार = संयुक्त वाक्य
४. जे चकाकते ते सोने नसते. वाक्याचा प्रकार = मिश्रवाक्य
५. आईने बाजारातून फळे,भाज्या व खाऊ आणला. वाक्याचा प्रकार = संयुक्त वाक्य
६. आम्ही शाळेत जातो. वाक्याचा प्रकार = केवलवाक्य

**प्रश्न९. समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही २)**

१.किल्ला = गड    २.शौर्य = पराक्रम    ३. कन्या = मुलगी

**प्रश्न१०. विरुद्धार्थी शब्द लिहा.(कोणतेही २)**

१.सुरुवात X शेवट    २. प्रकाश X अंधार -    ३. हलके X जड

**प्रश्न११. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.**
**(2QX1M=2)**

१. धिंड काढणे – जाहीरपणे बेईज्जत करणे    २.-हैराण करणे - त्रास देणे

**प्रश्न १२. खालील शब्दांचे लिंग बदला.**


१.मामा - मामी    २.गायक - गायिका

**प्रश्न १३. खालील शब्दांचे वचन बदला.**

१.प्रसंग - प्रसंग    २.भेट - भेटी

**विभाग 'क' (लेखन विभाग)**

**प्रश्न१४. खालील चित्र पाहून ५ ते १० ओळींत चित्रवर्णन करा. (विद्यार्थी प्रतिसादानुसार)**



प्रश्न १५. तुम्हाला शाळेमध्ये 'छंद वर्गात'सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र मुख्याध्यापकांना लिहा.

किंवा

वनमहोस्तवात वृक्षारोपण करण्यासाठी रोपे मागवणारे पत्र वन अधिकाऱ्यास लिहा.

(विद्यार्थी प्रतिसादानुसार)

प्रश्न१६.. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत निबंध लिहा.

१. इंटरनेटचा वापर फायदा की तोटा

२. मला पडलेले स्वप्न (विद्यार्थी प्रतिसादानुसार)